शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथील मैदानाचा वापर खेळाव्यतिरिक्त अन्य कार्यक्रमांसाठी करण्यास परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीएमसी-२५१५/प्र.क्र.१२७०/नवि-२१

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० जानेवारी, २०१६.

<u>प्रस्तावना</u> :

वेलकम ट्रस्ट व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्रमांक ११६/२००९ दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये महाराष्ट्र शासन व बृहन्मुंबई महानगरपालिका यांनाही प्रतिवादी करण्यात आले आहे. सदर याचिकेमध्ये याचिकाकर्त्यांनी शिवाजी पार्क मैदान हे मनोरंजन मैदान आणि / किंवा खेळाचे मैदान आहे का, शिवाजी पार्क हा भाग शांतता क्षेत्र म्हणून घोषित करण्यात यावा आणि या मैदानाचा वापर निश्चित केलेल्या उद्दिष्टांव्यतिरिक्त अन्य उद्दिष्टांसाठी होत असल्याबाबतचे मुद्दे उपस्थित केले आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी या प्रकरणी दिनांक ०४ जानेवारी, २०१३ रोजी आदेश पारित केले आहेत.

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या नियम ३७ (अ) मधील तरतूदीनुसार, शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथील मैदानाचा वापर खेळाव्यतिरिक्त स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन यासारखे राष्ट्रीय कार्यक्रम तसेच राष्ट्रीय नेत्यांच्या जयंती आणि पुण्यातिथींच्या कार्यक्रमासाठी तसेच सार्वजनिक सभा आणि धार्मिक कारणांसाठी/ उत्सवांसाठी वर्षातून ४५ दिवस करता येऊ शकेल. सदर तरतुदीनुसार तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी या प्रकरणी दिनांक ०४ जानेवारी, २०१३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार शासनाने, दरवर्षी शिवाजी पार्क, दादर येथील मैदानाचा वापर खेळाव्यतिरिक्त बालदिन कार्यक्रम, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन, गणेश विसर्जन, दसरा मेळावा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन या कार्यक्रमांसाठी एकूण ३४ दिवसांसाठी परवानगी देण्याचे निश्चित केले असल्याचे नमूद करुन उर्वरित शिल्लक राहणाऱ्या ११ दिवसांकरीता ज्या कोणास शिवाजी पार्क मैदान कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आवश्यक असेल त्यांनी यासंदर्भातील आपली निवेदने जाहिरातीच्या दिनांकापासून २० दिवसांच्या आत नगर विकास विभाग, ४ था मजला, मंत्रालय मुंबई येथे किंवा udd.ud२१@gmail.com या ई-मेल वर सादर करण्याची जाहिरात दि. २१.११.२०१५ च्या दैनिक वर्तमानपत्रात देण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेली निवेदने विचारात घेऊन, दरवर्षी शिवाजी

पार्क, दादर, मुंबई येथील मैदानाचा वापर खेळांव्यतिरिक्त अन्य कार्यक्रमासाठी करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याअनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय :-

त्यानुसार आता याद्वारे, दरवर्षी शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथील मैदानाचा वापर खेळांव्यतिरिक्त खालील कार्यक्रमासाठी करण्यास परवानगी देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

अ.क्र.	दिनांक	कार्यक्रमाचे स्वरुप	दिवस
१.	१४ व १५ जानेवारी	बालदिन कार्यक्रम-बालमोहन विद्यामंदिर	०२
२.	२६ जानेवारी	प्रजासत्ताक दिन (महाराष्ट्र शासन)	१०
३.	१ मे	महाराष्ट्र दिन (महाराष्ट्र शासन)	०५
४.	१५ ऑगस्ट	स्वातंत्र्य दिन (महाराष्ट्र शासन)	०५
५.		गणेश विसर्जन (पार्कींग व्यवस्था) (पाचवा, सातवा व दहावा दिवस)	०३
६.	६ डिसेंबर	डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन	०७
७.		दसरा मेळावा, जगन्नाथ रथयात्रा, मराठी भाषा दिन, गुढीपाडवा इत्यादी कार्याक्रमांकरीता.	०७
८.		प्रसंगानुरूप शासन निश्चित करुन देईल अशा कार्यक्रमांसाठी	०६
		एकुण दिवस	४५

०२. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथील मैदानाचा वापर वरील कार्यक्रमासाठी करण्यास संबंधितांना खालील अटींच्या अधीन राहून परवानगी द्यावी :-

अ) The Noise Pollution (Regulation and Control) Rule, २००० मधील तरतूदींचे पालन करण्याच्या अटीवर.

ब) मा. न्यायालयाच्या दिनांक ०४ जानेवरी, २०१३ च्या आदेशातील तरतूदींचे पालन करण्याच्या अटीवर.

क) आवश्यक तेथे पोलीस अधिकाऱ्यांची परवानगी घेण्यात यावी.

ड) मैदान राखीव ठेवताना महानगरपालिकेस आवश्यक वाटतील अशा महानगरपालिकेकडून घालण्यात येणाऱ्या अन्य अटी व शर्ती.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२०१५४४३८१५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sakharam Kharat

Digitally signed by Sakharam Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=eb1cb39de10fe09852a24a5fa63add6d5b204146d3716e740e20fb4b2a378a55, cn=Sakharam Kharat
Date: 2016.01.20 15:46:16 +05'30'

(स.दि. खरात)
अवर सचिव

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
३. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक.
४. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
९. निवडनस्ती, नवि-२१.